## पूजाअर्चना

# अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

ऑक्टोबर २०२४

वर्ष ४९ अंक १०





श्रीमाताजी

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---


**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१

**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com

**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१


**चिंतनार्थ...**

आपल्यापेक्षा जे महान आहे त्याची केलेली पूजा, आराधना, त्याच्याप्रति केलेले आत्मार्पण हे 'भक्ती'चे स्वरूप असते. तर त्याच्या सान्निध्याची व एकत्वाची आस बाळगणे किंवा तशी भावना असणे हे 'प्रेमा'चे स्वरूप असते. आत्मदान हे दोन्हीचे लक्षण असते. भक्ती आणि प्रेम या दोन्ही गोष्टी योगमार्गामध्ये आवश्यक असतात आणि जेव्हा एका गोष्टीचा दुसऱ्या गोष्टीला आधार असतो तेव्हाच या दोन्ही गोष्टींना पूर्ण शक्ती प्राप्त होते.

– श्रीअरविंद (CWSA 29 : 356)

*

# पूजाअर्चना

संपादकीय........................................................................०२
भक्तिभावना......................................................................०३
प्रार्थना आणि समर्पण..........................................................१४
पूर्णयोगांतर्गत भक्तिसाधना...................................................१९
ईश्वरी उपस्थिती.................................................................३२

---

## संपादकीय

धार्मिक व्यक्ती पूजाअर्चना, प्रार्थना, नामसंकीर्तन इत्यादी गोष्टींमध्ये मनापासून रममाण होताना दिसतात. या सगळ्याकडे वळण्याचा व्यक्तीचा हेतू सुरुवातीला व्यावहारिक असू शकतो. परंतु याच सर्व गोष्टी निरपेक्ष भावनेने केल्या, ईश्वरार्पण वृत्तीने केल्या तर त्या अध्यात्म-साधनेसाठी देखील उपयुक्त ठरू शकतात. कुलपरंपरेने चालत आलेल्या देवदेवता आणि त्यांची उपासना ही पूर्णयोगासाठी हितकारक असते की अपायकारक, यासारखे प्रश्न पूर्णयोगाच्या नवोदित साधकाला पडू शकतात. यासारख्या प्रश्नांची उत्तरे या अंकात मिळतील असा विश्वास वाटतो. पूजाअर्चना या विषयाला 'अभीप्सा' मासिकाचा हा अंक वाहिलेला आहे.

संपादक, अभीप्सा मासिक

**

---

अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.

---

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

# भक्तिभावना

## अहैतुक भक्ती

(श्रीअरविंद लिखित एका पत्रामधून...)

तुम्हाला जर अहैतुक भक्तीच्या मार्गाचे अनुसरण करायचे असेल तर कोणतीच अडचण दिसत नाही; कारण त्या मार्गापेक्षा अन्य कोणताच मार्ग इतका प्रभावी असू शकत नाही. कारण या मार्गामध्ये प्रत्येक गोष्टीला माध्यम बनविता येते, मग ते काव्य असो किंवा संगीत. येथे काव्य किंवा संगीत हे केवळ काव्य किंवा संगीतच राहत नाही किंवा ती भक्तीची फक्त अभिव्यक्तीच राहत नाही तर काव्य आणि संगीत या गोष्टी स्वयमेव भक्ती आणि प्रेमाचा अनुभव येण्यासाठीची माध्यमं ठरतात. स्वयमेव ध्यान हे सुद्धा मानसिक एकाग्रतेचा केवळ प्रयत्न राहत नाही तर प्रेम, आदर आणि पूजेचा तो एक प्रवाह बनतो.

अगदी साधेपणाने आणि प्रामाणिकपणाने जर या मार्गाचे अनुसरण केले तर अहैतुक भक्ती ही इतर कोणत्याही मार्गांइतकीच साधकाला प्रगतिपथावर दूरपर्यंत घेऊन जाते.

– श्रीअरविंद (CWSA 29 : 355)

*

भक्तीचा आणि प्रेमाचा प्रवाह जितक्या जास्त वेळा जागृत आणि प्रवाहित होतो, तितक्या अधिक प्रमाणात तो प्रवाह व्यक्तित्वाच्या सर्व भागांपर्यंत जाऊन पोहोचतो आणि त्यांच्यावर त्या प्रवाहाचा परिणाम होतो, हे स्वाभाविकच असते.

– श्रीअरविंद (CWSA 29 : 354-355)

*

## प्रेम आणि भक्ती

आपल्याहून जे श्रेष्ठ आहे त्याची पूजा, आराधना आणि त्याच्याप्रति आत्मार्पण हे भक्तीचे स्वरूप असते तर, समीपतेची आणि एकत्वाची

भावना किंवा त्यासाठीची ओढ हे प्रेमाचे स्वरूप असते. आत्मदान हे दोन्हीचे स्वरूप असते. प्रेम व भक्ती या दोन्ही गोष्टी योगामध्ये आवश्यक असतात आणि जेव्हा प्रेमाला भक्तीची व भक्तीला प्रेमाची जोड मिळते तेव्हा तिथे भक्तीचा परमोत्कर्ष झालेला असतो.

– श्रीअरविंद (CWSA 29 : 356)

*

प्रेम हे 'ईश्वरा'चे नाम नाही, तर ती त्याच्या चेतनेची आणि अस्तित्वाची शक्ती आहे. प्रेम आणि भक्ती या दोन्ही गोष्टी एकसमान नाहीत परंतु प्रेम हा भक्तीचा एक घटक आहे.

भक्ती अनेकविध प्रकारची असते आणि जी भक्ती प्रेमस्वरूप असते ती सर्वात प्रभावी आणि सर्वोच्च, तसेच सर्वात उत्कट आणि सर्वात आनंददायी असते, असे मानले जाते. आणि ज्या प्रेमामध्ये आत्मदान, समर्पण, निःशेष आराधना, निःस्वार्थी ऐक्यासाठी असलेली तळमळ या गोष्टी आढळून येतात, ते खरे प्रेम असते, ती खरी भक्ती असते.

'प्रेमावर विजय संपादन करणे' किंवा 'विजेत्यावर प्रेम करणे' याचा अर्थ असा की, प्रेम–सत्तेच्या मार्गामध्ये जे काही आड येते त्यावर, म्हणजे अज्ञान, मिथ्यत्व, स्वार्थीपणा, अहंकार, आवेग, कामवासना, बाह्यात्कारी किंवा स्वार्थी इच्छावासना आणि तत्सम सर्व गोष्टींवर प्रेमाद्वारे मात करून, विजय संपादन करणे आणि 'दिव्य चेतने'चे इतरही सर्व प्रसाद प्राप्त करून घेऊन, अंतिमतः केवळ प्रेमाचेच साम्राज्य अस्तित्वात राहणे आणि प्रेम विजयी होणे. प्रेम, निःस्वार्थीपणा आणि आत्मदानाच्या शक्तीद्वारेच साधक 'दिव्य प्रेमा'च्या विजयासाठी साहाय्य करू शकतो.

– श्रीअरविंद (CWSA 29 : 356)

*

प्रेम हा ज्या भक्तीचा आधार असतो ती भक्ती म्हणजे प्रेमभक्ती. पूजाअर्चना, शरणागती, आदर, आज्ञापालन इत्यादींवर आधारित अशी

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७६ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

# सेवा आणि आत्मदान यांचा आदर्श

श्रीअरविंदांनी महासमाधी घेण्याच्या आधी बारा वर्षे म्हणजे १९३८ ते १९५० या कालावधीमध्ये निरोदबरन आणि चंपकलाल हे दोघे साधक त्यांच्या सेवेत होते.

चंपकलालजी यांच्या निधनापूर्वी त्यांची तब्येत खालावत चालली होती तेव्हा निरोदबरन यांना अंतरंगामधून श्रीअरविंदांची वाणी ऐकू आली. ते म्हणत होते की, ''मी वाट पाहत आहे, (निधनानंतर) चंपकलाल थेट माझ्याकडे येतील.'' निरोदबरन यांनी आपल्या या मित्राच्या काही आठवणी सांगितल्या आहेत. त्यांनी लिहिले आहे की, हनुमानासारखे निःस्सीम सेवक होणे हे चंपकलालजींच्या अस्तित्वाचे मूळ प्रयोजन होते.

*

एकदा चंपकलालजींनी श्रीअरविंदांना विचारले होते की, ''मी कोठे चाललो आहे, आणि मी काय करत आहे?''

तेव्हा श्रीअरविंदांनी त्यांना असे उत्तर दिले की, ''तुम्ही कोठे आहात? तर, तुम्ही येथे श्रीमाताजींच्या उपस्थितीमध्ये आणि माझ्या जवळ आहात. तुम्ही कोठे निघाला आहात? तर, श्रद्धा आणि सेवेच्या माध्यमातून ईश्वराशी एकात्म पावण्याच्या दिशेने तुम्ही निघाला आहात. तुम्ही येथे काय करत आहात? तर सेवा आणि ईश्वराप्रति आत्मदान! श्रीमाताजींनी तुम्हाला लिहिल्याप्रमाणे, तुम्ही सेवा आणि आत्मदान किती साधेपणाने आणि पूर्णत्वाने करता यावर बाकी सर्व गोष्टी अवलंबून आहेत.''

*

एके दिवशी कोणीतरी श्रीमाताजींना म्हटले की, ''माताजी, मला चंपकलाल यांच्याप्रमाणे तुमचे बालक व्हायचे आहे.'' तेव्हा श्रीमाताजी म्हणाल्या की, ''तुम्ही त्यांच्यासारखे होऊ इच्छित असाल तर, तुम्हाला अतिशय कठोर शिस्तीचे पालन करावे लागेल. मी त्यांना किती अवघड शिस्त सांगितली आहे हे त्यांना एकदा विचारून बघा.'' नंतर श्रीमाताजींनी स्वतः एकदा चंपकलाल यांना सांगितले की, ''बऱ्याच लोकांना माझ्या सन्निध राहायचे असते आणि म्हणून ते माझ्याकडे काहीतरी काम मागतात. तेव्हा मी त्यांना तुमचे नाव सांगते आणि त्यांना म्हणते, आधी तुम्ही चंपकलाल यांच्यासारखे निःस्वार्थी व्हा.''

– आधारित (Champaklal speaks)

*

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमशः)

### १५ ऑगस्ट २००३

आम्हाला परिपूर्ण अनुभव असल्यामुळेच, आम्ही इतरांना अगदी सरळ आणि सोपा मार्ग दाखवू शकतो; त्यांनी तो मार्ग अनुसरण्यास सहमती मात्र द्यायला हवी. आम्ही फार मोठी किंमत चुकती करून, हा अनुभव घेतलेला असल्यानेच, आम्ही तुम्हाला आणि इतरांना कळकळीने सांगू शकतो की, ''आंतरात्मिक दृष्टिकोन स्वीकारा; सरळ सूर्यालोकित मार्गाचे अनुसरण करा, कारण 'ईश्वर' प्रकट वा अप्रकटपणे तुमचा सांभाळ करत आहे. तुमच्या नकळत तो तुमचा सांभाळ करत असेल तर, तो केव्हातरी एका सुमुहूर्तावर तुम्हाला ते दाखवून देईल; परंतु कठीण, कुंठित, दूरवरच्या आणि अवघड अशा प्रवासाचा आग्रह धरू नका.''

– श्रीअरविंद (CWSA 32 : 95)

*

### १७ नोव्हेंबर २००३

शांत व स्थिर चित्त बसावे आणि श्रीमाताजींचे स्मरण करत, त्यांच्याप्रति स्वतःला खुले करावे. हा ध्यानाचा नियम आहे.

– श्रीअरविंद (CWSA 09 : 423)

*

### २४ नोव्हेंबर २००३

'ईश्वरा'चा साक्षात्कार हीच एकमेव आवश्यक गोष्ट आहे आणि एखादी गोष्ट जर त्याकडे घेऊन जाणारी असेल किंवा त्यासाठी साहाय्य करणारी असेल किंवा एकदा साक्षात्कार झाल्यानंतर, एखाद्या गोष्टीमुळे तो साक्षात्कार अधिक व्यापक होणार असेल, किंवा त्या साक्षात्काराचे आविष्करण होणार असेल, तरच ती गोष्ट इष्ट असते.

– श्रीअरविंद (CWM 35 : 784)

*